# प्रेसनोट

दि.२४/०३/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | पारनेर पो.स्टे., जि.अहिल्यानगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | आशीर्वाद प्रभाकर घोरपडे, वय–३४ वर्ष, धंदा–नोकरी, तलाठी सजा पाडळी आळे, वर्ग–३, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर. |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ३,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे पाडळी आळे, ता.पारनेर येथील रहिवासी आहेत. तक्रारदार यांच्या आत्या हया शेजारच्या कळस, ता.पारनेर या गावच्या मुळ रहिवासी असून त्या अशिक्षित आहेत. कळस येथे तक्रारदार यांच्या आत्याचे पती यांचे नावे शेत जमीनीचे गट क्रमांक ३७ व गट क्रमांक ४८ असे दोन गट आहेत. तक्रारदार यांच्या आत्याचे पती हे दि.६/८/२०२३ रोजी मयत झाले होते. तक्रारदार यांचे आत्याच्या पतीच्या नावे असलेल्या शेत जमीनीला वारसदार आहेत. सदर शेत जमीनीला वारस नोंद लावण्यासाठी पाडळी आळीचे तलाठी यांच्याकडे सर्व संबंधित कागदपत्रे एक महिन्यापूर्वी जमा केली होती. तक्रारदार यांच्या आत्या हया अशिक्षित तसेच वयोवृध्द असल्याने व तक्रारदार यांचा आते भाऊ हा पनवेल, नवी मुंबई येथे वास्तव्यास असल्याने त्यांच्या कळस येथील शेत जमीनी बाबतच्या वारस नोंदीच्या कामाचा पाठपुरावा करण्यासाठी तक्रारदार यांच्या आत्या यांनी तक्रारदार यांना अधिकार पत्र दिले आहे. सदर वारस नोंद लावण्याकरीता लोकसेवक घोरपडे, तलाठी सजा पाडळी आळे यांनी ५०००/– रुपये लाचेची मागणी केले बाबतची तक्रार दि.२४/३/२०२५ रोजी ला.प्र.वि. अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती. सदर लाच मागणी तक्रारीच्या अनुषंगाने दि.२४/३/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक आशीर्वाद प्रभाकर घोरपडे, तलाठी सजा पाडळी आळे, ता.पारनेर यांनी पंचा समक्ष तक्रारदार यांचेकडे शेत जमीनीची वारस नोंद लावण्यासाठी ३०००/– रुपये लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. दि.२४/३/२०२५ रोजी तलाठी कार्यालय पाडळी आळे, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर येथे आयोजित सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक घोरपडे यांनी पंचा समक्ष तक्रारदार यांचेकडून ३०००/– रुपयांची लाच स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सदर बाबत आरोपी लोकसेवक आशीर्वाद प्रभाकर घोरपडे यांचेविरुध्द पारनेर पोलीस स्टेशन, जि.अहिल्यानगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर